राज्यातील सर्व विद्यापीठे आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कार रुजावेत यासाठी **'वाचन संकल्प महाराष्ट्राचा'** या उपक्रमांतर्गत महाविद्यालयामार्फत **'लेखकाशी संवाद'** हा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता.

या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून श्री. संजीव राऊत सर हे उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वाचन चांगले असेल तर तुम्ही लेखन चांगले करु शकता, लिखाणासाठी तुमची निरीक्षण शक्ती चांगली असली पाहिजे असे सांगितले. त्यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी लेखन कौशल्य विकसित करण्यासाठी कोणकोणत्या बाबी महत्वाच्या आहेत आणि यासाठी कश्या प्रकारची पूर्व तयारी करणे गरजेचे आहे याबाबत विचारणा केली. तसेच नाटक या साहित्य प्रकारावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी काही नाटकांचे संवाद मालवणी भाषेतून त्यांनी सांगितले. नाटक सादर करताना समय सूचकता असली पाहिजे असे मत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे नियोजन महाविद्यालयाचे प्रा. डॉ. विजयकुमार कुनुरे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथपाल डी. जी. शेवाळे यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्रास्ताविक प्रा. संतोष गिडये यांनी केले. तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. श्रीकांत शिरसाठे यांनी सदर कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी का महत्वाचा आहे यांचे विवेचन करून लेखकाशी संवाद या कार्यक्रमाचे महत्व विषद केले आणि विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त वाचन करावे त्यातूनच उद्याचे लेखक घडू शकतात असे सांगितले. सदर कार्यक्रमास डॉ. कामत, प्रा. राऊत, डॉ. वानखडे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आभार प्रा. सुहास खरात यांनी मांडले.

